| MHNG100013382021 | | |
|---|---|---|
| | दाखल तारीख | १२-१०-२०२१ |
| | नोंदणी तारीख | १२-१०-२०२१ |
| | निकाल तारीख | ०४-०५-२०२६ |
| | कालावधी | ०४ ०६ २२ |
| | | वर्ष महिने दिवस |

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र.२, उमरेड यांच्या न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी आर.एस.मानकर)**

**नि.फौ.ख.क्र.१००/२०२१**
**न्यायनिर्णय नि.क्र.३३**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | : | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस स्टेशन बेला, |
| तर्फे विधिज्ञ | : | सहा.सरकारी अभियोक्ता श्री.जे.एम.बोरकर |
| | | **- विरुध्द -** |
| आरोपी | : | **मुकेश आनंदा लेंडे.**<br>वय ४० वर्षे, व्यवसाय –मजुरी<br>रा.सिर्सी, तह.उमरेड,जि.नागपूर. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | : | श्री एम.आर.धांडे |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | २९-०५-२०२१ |
| पहीली खबर दिनांक | : | २९-०५-२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | : | १२-१०-२०२१ |
| दोषारोप निश्चित दिनांक | : | २३-०९-२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | ०१-०२-२०२५ |
| न्यायनिर्णयाकरीता निश्चित केल्याचा दिनांक | : | ०४-०५-२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | : | ०४-०५-२०२६ |
| शिक्षेचा दिनांक, असल्यास | : | - |

**आरोपीचा तपशिल**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेचा तपशील | जामीनावर सुटल्याची तारीख | गुन्हा कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षेचा तपशिल | कलम ४२८ फौ.प्र.संहीतेच्या अनुषंगाने संपरीक्षे दरम्यान कोठडीतील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मुकेश आनंदा लेंडे | सुचनापत्रावर सोडले | १३.१०.२०२१ | भारतीय दंड संहिता कलम ३७९ | निर्दोष | – | निरंक |

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालयाचे साक्षीदारांची यादी**

**अ) अभियोग पक्ष -**

| क्रमांक | नाव | | पुराव्याचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | भोजराज पुंडलिक तांदळे | : | घटनास्थळ पंच (नि.क्र.१३) |
| २ | नंदकिशोर विठोबाजी पडोळे | : | घटनास्थळ पंच (नि.क्र.१७) |
| ३ | पो.ह.राजु विष्णु राठोड | : | फिर्यादी (नि.क्र.२०) |
| ४ | संजय कवडुजी फटिंग | : | साक्षीदार (नि.क्र.२६) |
| ५ | अनिल दशरथ शहारे | : | साक्षीदार (नि.क्र.२७) |
| ६ | रामकृष्ण जिबलजी मेहर | : | साक्षीदार (नि.क्र.२८) |

**ब) आरोपी तर्फे साक्षीदार, असल्यास**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशिल |
|---|---|---|
| ..........निरंक............. | | |

**क) न्यायालयातर्फे साक्षीदार, असल्यास**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशिल |
|---|---|---|
| ..........निरंक............. | | |

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालया चे निशाणी क्रमांकाची यादी**

**अ) अभियोग पक्ष -**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | तपशिल |
|---|---|---|
| १ | नि. क्र.१४ | समन्सपत्रावरिल सही |
| २ | नि. क्र.१५ | घटनास्थळ पंचनाम्यावरिल सही |
| ३ | नि. क्र.१८ | समन्सपत्रावरिल सही |

| | | |
|---|---|---|
| ४ | नि. क्र.१९ | घटनास्थळ पंचनाम्यावरिल सही |
| ५ | नि.क्र.२१ | फिर्याद |
| ६ | नि.क्र.२२ | प्रथम खबर अहवाल |
| ७ | नि.क्र.२३ | समन्सपत्र |
| ८ | नि.क्र.२४ | घटनास्थळ पंचनामा |

**ब) आरोपी /बचाव पक्षाचे साक्षीदार**

| अनुक्रमांक | निशाणी क्रं. | तपशिल |
|---|---|---|
| ..........निरंक............. | | |

**क) न्यायालयाचे साक्षीदार**

| अनुक्रमांक | निशाणी क्रं. | तपशिल |
|---|---|---|
| ..........निरंक............. | | |

**गुन्हा कलम ३७९**
**भारतीय दंड संहिता अन्वये.**

**न्यायनिर्णय**
**(दिनांक ०४-०५-२०२६)**

प्रस्तुतचा खटला हा आरोपींविरूध्द भारतीय दंड विधान शिक्षाधीन कलम ३७९ भारतीय दंड विधान प्रमाणे आरोप ठेवून चालविण्यात आला आहे.

**अभियोग पक्षातर्फे थोडक्यात हकीकत अशी आहे की -**

**०२.** फिर्यादी ना.पो.शि. राजु राठोड यांनी त्यांच्या फिर्यादमध्ये असे सांगितले आहे की, दिनांक २९/०५/२०२१ रोजी ते सैनिक/१२६७, ४००१ सोबत सिर्सी गावात रोडवर मोटार वाहणाचे चेकिंग करित असता, रोडवर ट्रॅक्टर क्र.एम.एच.३४ एल.३९२२ हा त्यांना येतांना दिसला व सदर ट्रॅक्टरच्या ट्रॉली क्र.एम.एच.३४ एल.३९२३ मध्ये रेती भरून दिसली. त्यांनी सदर ट्रॅक्टर थांबवुन ट्रॅक्टर चालकास त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्यांचे नाव मुकेश आनंदराव लेंडे असे सांगितले. तसेच सदर ट्रॅक्टर चालकाला परवाना विचारला असता त्याने परवाना नसल्याचे सांगितले. सदरच्या ट्रकमध्ये १ ब्रास रेती होती. त्यामुळे त्यांनी पो.स्टेशनला रिपोर्ट

दिली.

**०३.** फिर्यादीच्या रिपोर्टवरुन आरोपीविरुध्द बेला पो.स्टे.येथे गुन्हा क्र.६५/२०२१ नोंदविण्यात आला. सदर प्रकरणात आरोपींविरुध्द नि.क्र.१० प्रमाणे कलम ३७९ भारतीय दंड विधान प्रमाणे आरोप ठेवला.

**०४.** सदर प्रकरणात आरोपीविरुध्द गुन्हा दर्शक पुरावा अभिलेखावर मिळून आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नि. क्र.३२ प्रमाणे नोंदविण्यात आले त्यामध्ये त्यांनी त्यांच्याविरूध्द खोटी केस केल्याचे सांगितले.

**०५.** सदर प्रकरणामध्ये खालील मुद्दे विचारार्थ आले ते निष्कर्षासह व कारणमिमांसेह पुढील प्रमाणे -

| **अनु.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने सिध्द केले काय की, दि. २९-०५-२०२१ रोजी १४.०० ते १५.०० वाजताच्या दरम्यान मौजा सिर्सी, ता.उमरेड, जि.नागपूर येथे तुम्ही आरोपीने तुमच्या तुमच्या ट्रॅक्टर क्र. एम.एच.३४ एल.३९२२ या ट्रॅक्टरच्या च्या ट्रॉली क्र. एम.एच.३४ एल.३९२३ मध्ये अवैधरित्या विनापरवाना, नदीतील रेती गौन खनिज १ ब्रास विना रॉयल्टी अंदाजे किंमत ५,०००/- रूपयांची चोरी करून वाहतुक करतांना आढळून आलात आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहितेचे कलम ३७९ अन्वये गुन्हा केला ? | **नाही** |
| २ | आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र. १ ते २ बाबत</u>** :-

**०६.** फौजदारी कायद्याचे तत्व आहे की, आरोपीविरुध्द गुन्हा सर्व संशयापलीकडे जाऊन सिध्द करण्याचा संपूर्ण भार हा अभियोगपक्षावर असतो. सदर प्रकरणात आरोपीने अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरी करून वाहतुक करतांना मिळून आला ही बाबी अभियोगपक्षाने संशयापलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे.

**०७.** अभियोगपक्षातर्फे श्री.जे.एम.बोरकर सहा.सरकारी अभियोक्ता यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे सांगितले की, अभियोगपक्षाने एकुण ०६ साक्षीदार तपासले आहे. फिर्यादीने जी घटना घडली त्याबाबत त्याच्या फिर्यादमधील मजकुराशी सुसंगत अशी साक्ष दिली आहे. एकंदरित अभियोगपक्षाने अरोपीवरील दोषारोप संशयापलीकडे सिध्द केलेले आहे त्यामुळे आरोपीस शिक्षा द्यावी अशी विनंती केली. याउलट आरोपीचे वकील श्री.एम.आर.धांडे यांनी युक्तीवाद करून असे सांगितले की, फिर्यादी यांच्या सरतपासातील, उलटतपासातील व फिर्यादमधील मजकुर यामध्ये आमुलाग्र अशी तफावत अभिलेखावर आल्याचे दिसुन येते. तसेच ज्यांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार करण्यात आला त्यांनी अभियोग पक्षास पाठपुरावा केलेला नाही. अभियोग पक्षाने स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष घेतली नाही. त्यामुळे आरोपीवरील दोषारोप हा संशयापलिकडे सिध्द केलेला नाही त्यामुळे आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात यावी अशी विनंती केली.

**०८.** मी अभियोगपक्षाच्या पुराव्याचे खालीलप्रमाणे काळजीपुर्वक अवलोकन केले आहे. सा.क्र.३ पो.ह.राजु राठोड यांच्या साक्षीमध्ये असे आहे आहे की, दि.२९/०५/२०२१ रोजी ते पो.स्टे.बेला येथे कार्यरत होते. सदर दिवशी ते सिर्सी येथे वाहतुक केसेस करत होते. त्यावेळेस त्यांच्यासोबत दोन कर्मचारी होते. त्यावेळी त्यांना एक ट्रॅक्टर येतांना दिसला. त्यावेळी त्याला हात देउन थांबविले. सदर ट्रॅक्टरचा नंबर एम.एच.३५ एल.३९२२ असा होता. त्यावेळी सदर ट्रॅक्टर चालकाला त्याचे नाव, गाव विचारले असता त्याने त्याचे नाव मुकेश लेंढे असे सांगितले. त्याला मालाबाबत विचारले, तसेच ट्रॅक्टरमध्ये रेती भरून आहे याबाबत परवाना आहे किंवा कसे असे विचारले असता, त्याने परवाना नसल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी पंचांना सुचनापत्र देउन

पंचनामा केला व पुढील कारवाईकरिता सदरचा ट्रॅक्टर पो.स्टे.ला नेला. सदर ट्रॅक्टरमध्ये एक ब्रास रेती किंमत रूपये ५,०००/– व ट्रॅक्टर व ट्रॉलीची किंमत रूपये ४,००,०००/–असा मुद्देमाल जप्त केला. त्यानंतर कायदेशीर कारवाई करण्याकामी फिर्याद दाखल केली. त्यांनी पंचांना समन्सपत्र देऊन घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. घटनास्थळ पंचनाम्यादरम्यान रेतीचोरीबाबत व जप्त केलेल्या ट्रॅक्टरबाबत जप्ती पंचनामा तयार केला. त्यांनी घटनास्थळावर रेती व ट्रॅक्टरचे फोटो काढले होते.

०९. फिर्यादीच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता फिर्यादीने मान्य केले आहे की, सदर घटनेबाबत किती वाजता कारवाई केली हे त्यांना माहिती नाही व ती बाब फिर्यादमध्ये सुध्दा फिर्यादीने सांगितली नाही. तसेच सदर फिर्यादीने त्यांच्या पुराव्यामध्ये आरोपीने ट्रॅक्टर मध्ये रेती कोठून आणली होती, सदर रेती कोणाच्या मालकीची होती त्याबाबत काही सांगितले नाही फिर्यादी त्यांच्या पुराव्यात पुढे सांगतात की, रॉयल्टी बाबत त्यांनी मालकाला विचारले होते. परंतु, रॉयल्टी हस्तगत करण्यासाठी काय तपस केला अथवा तपासाअंती रॉयल्टीबाबत काय पुरावा अभिलेखावर आला होता, याबाबत फिर्यादी काहीही सांगत नाही. अभियोगपक्षाला पुरेशी संधी देऊनही तपासी अंमलदार यांची साक्ष नोंदवली नाही.

**१०.** सदर साक्षीदार यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता आरोपीने सदर ट्रॅक्टरमधील रेती कोठून आणली होती याबाबत सांगितलेले नाही. तसेच सदर ट्रॅक्टरमधील रेती ही कुणाच्या मालकीची होती याबाबतही सांगितलेले नाही. रॉयल्टीबाबत ट्रॅक्टर मालकाला विचारले असे त्याच्या सरतपासात आलेले आहे. परंतु, रॉयल्टी जरी नसली तरी सदर रेती कोठून आणली व ती कुणाच्या मालकीची होती याबाबत सदर साक्षीदाराने सांगितलेले नाही.

**११.** अभियोगपक्षाने सा.क्र. १ भोजराज, सा.क्र.२ नंदकिशोर, सा.क्र.४.संजय, सा.क्र.५ अनिल व सा.क्र.६ रामकृष्ण यांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे त्यांना सहायक सरकारी अभियोका यांनी उत्तर सुचक प्रश्न विचारले परंतु त्यांच्या साक्षीमध्ये अभियोग पक्षास उपयुक्त असा पुरावा अभिलेखावर

आल्याचे दिसुन येत नाही. अभियोगपक्षाला पुरेशी संधी देऊनही त्यांनी इतर स्वतंत्र साक्षीदार तपासले नाही. एकंदरीत आरोपीवर केलेल्या कारवाईबाबतचा पंचरनामा सिध्द झाल्योच दिसून येत नाही.

**१२.** एकंदरित वरिल संपुर्ण पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर क्र. एम.एच.३४ एल.३९२२ या ट्रॅक्टरच्या च्या ट्रॉली क्र. एम.एच.३४ एल.३९२३ मध्ये अवैधरित्या विनापरवाना रेती एक ब्रास विना रॉयल्टी चोरी करून वाहतुक करतांना आढळून आला ही बाब अभिलेखावरिल आलेल्या पुराव्यामध्ये संशयापलिकडे अभियोगपक्षाला सिध्द करता आलेली नाही असे माझे स्पष्ट मत आहे. सबब मी मुद्दा क्र.०१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.०२ साठी खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

**१.** आरोपी **मुकेश आनंदा लेंडे** यांची भारतीय दंड संहिता कलम **३७९** अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपींचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने कलम ४३७-अ फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे रक्कम रुपये १५,०००/- प्रत्येकी पुढील सहा महिन्याकरीता वैयक्तीक बंधपत्र लिहून द्यावे.

**४.** अभिलेखावरिल मुद्देमाल ट्रॅक्टर क्र.एम.एच.३४ एल.३९२२ व ट्रॉली क्र. एम.एच.३४ एल.३९२३ ही सुप्रुतनाम्यावर दिल्याचे दिसुन येत नाही. जर सदर ट्रॅक्टर ट्रॉलीसह सुप्रुतनाम्यावर दिली नसेल तर अपिल कालावधी संपल्यानंतर मुळ मालकाने सुप्रुतनाम्यावर देण्याबाबतचा अर्ज

दाखल केल्यास कागदपत्रांची योग्य ती शहानिशा करून सदर ट्रॅक्टर व ट्रॉली मुळ मालकास परत करण्यात यावी.

**५. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अग्रघोषीत करण्यात आला.**

RAVI SATYABHAN MANKAR

Judgment
Digitally signed by RAVI SATYABHAN MANKAR
Date: 2026.05.04 15:44:52 +0530

उमरेड (आर.एस.मानकर)
दि.०४.०५.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड